**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 7, July - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 01/07/2021 Accepted on : 14/07/2021 Publication Date: 31/07/2021

# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडण-घडणीत स्काऊट-गाईड उपक्रमाची परिणामकारकता

**[1] उमाकांत भीमराव किडीले, [2] डॉ. सुरेश व्ही. घुले**
[1] संशोधक, शिक्षणशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, महाराष्ट्र राज्य.
Email – kidileumakant@gmail.com
[2] मार्गदर्शक, प्राचार्य – महात्मा गांधी अध्यापक महाविद्यालय, सिडको, नांदेड.

**सारसंदेश (Abstract) :** माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास हे शिक्षणाचे परमोच्च ध्येय होय. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक, बौध्दिक व सांस्कृतिक विकासाचा पाया स्काऊट-गाईड उपक्रमातून आकाराला येत असतो. व्यक्तिमत्त्व ही संकल्पना फक्त रंग, रूप, शरीरयष्टी या दर्शनी गुणांशी संबंधित नसून ती व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक, प्रगट व अप्रगट तसेच वैयक्तिक व सामाजिक, जन्मजात व संपादिक अशा सर्व प्रकारच्या गुण-वैशिष्ट्यांचा परिपाक असते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर प्रामुख्याने दोन घटकांचा प्रभाव पडलेला असतो. 1. अनुवंश (Heredity) 2. परिस्थिती किंवा पर्यावरण (Environment) सुंदर व आकर्षक व्यक्तिमत्त्व तयार होण्यासाठी समाजीकरणाची प्रक्रिया यशस्वी होणे गरजेचे असते. समाजीकरणाची प्रक्रिया ही समायोजनावर अवलंबून असते व उत्तम समायोजनासाठी सामाजिक व्यवहारांचे व चालीरीतींचे ज्ञान प्राप्त करून घेणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा व्यक्तिमत्त्व विकास हा पक्का पाया असून सामाजिक अभिवृत्ती (social attitude) व सामाजिक मूल्यांचा (social values) व्यक्तिमत्त्व जडण-घडणीवर परिणाम होत असतो.

व्यक्तित्व व व्यक्तिमत्त्व हे दोन भिन्न शब्द असून व्यक्तित्व हे सजीव प्राणिमात्राचे प्राथमिक रूप आहे. व्यक्तित्व (Individuality) ही नैसर्गिक देणगी आहे. मनुष्याच्या बाबतीत विकसनशील व्यक्तित्व हे व्यक्तिमत्त्वात रूपांतरीत होत असते. विद्यार्थ्यांची शारीरिक ठेवण, बुध्दी, चारित्र्य, अभिवृत्ती, अभिरूची, स्वभाव, दृष्टिकोण, कर्तृत्व इ. घटकांचा समावेश त्यांच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीत होत असतो. इंग्रजीतील personality हा शब्द मूळ persona' या लॅटिन शब्दापासून तयार झालेला असून persona म्हणजे mask होय. त्यालाच मुखवटा असे संबोधले जाते. G. W. Alport म्हणतात, "व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वत:च्या परिसराशी व्यक्तीचे जे वैशिष्ट्यपूर्ण समायोजन होत असते. त्याला कारणीभूत असणारी व वर्तनाला चालना देणारी शारीरिक आणि मानसिक यंत्रणेची गतीशील संघटना होय."

शरीररचना, जैविक रसायने, विविध प्रकारच्या क्षमता, कुटुंब, शाळा, समाज, भौगोलिक परिस्थिती, मित्र परिवार इ. घटकांचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीवर प्रामुख्याने परिणाम होत असतो.

शालेय माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व जडणघडणीत स्काऊट-गाईड उपक्रमाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून शालेय शिस्त, वक्तशीरपणा, श्रमप्रतिष्ठा, देशभक्ती व राष्ट्रप्रेम, बंधुभाव, सहकार्यवृत्ती, सांघिकवृत्ती, तत्परता, निसर्गप्रेम, पर्यावरणरक्षण, स्त्री-पुरूष समानता, सामाजिक बांधिलकी, राष्ट्रीय एकता व एकात्मता इ. उच्चतम मानवी मूल्यांचा परिपोष करण्याचे कामही खऱ्या अर्थाने स्काऊट-गाईड उपक्रमाद्वारेच पार पाडले जाते. म्हणूनच माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीत स्काऊट-गाईड उपक्रमाचे महत्त्व अनन्य साधारण असे आहे.

**बीज शब्द : संकेतशब्द (Key Words):**
1. Scout & Guide – The national scouting and guiding association of India.
2. उपक्रम : योजना, प्रकल्प
3. व्यक्तिमत्त्व : व्यक्तीचे रूप, स्वभाव, वर्तणूक, दृष्टिकोण, चारित्र्य, बुध्दिमत्ता, कौशल्ये, भावभावनेचा एकत्रित परिपाक
4. जडणघडण : आकार, घाट, रूप
5. जनसंख्या : लोकसंख्या

## 1. प्रस्तावना (Introduction) :

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. शिक्षणाने माणूस विवेकी व विचारी बनतो. शालेय माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भावी नागरिक आहेत. त्यांना आदर्श व क्रियाशील नागरिक बनविण्यासाठी, त्यांच्यात राष्ट्रभक्ती, बंधुभाव, देशप्रेम, पर्यावरण रक्षण, स्त्रीपुरूष समानता, राष्ट्रीय एकता व एकात्मता निर्माण करण्यासाठी औपचारिक शिक्षणाबरोबरच स्काऊट-गाईड या उपक्रमाची त्यास जोड दिली तर हे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी उद्याच्या भारताचे आदर्श भावी नागरिक बनतील यात शंका नाही.

विकासाच्या शारीरिक किंवा क्रियात्मक (psychological or functional), भावनात्मक (emotional or affective) आणि ज्ञानात्मक किंवा बौद्धिक (Intellectual or cognitive) या अवस्थांचा पाया म्हणजेच स्काऊट-गाईड उपक्रम होय. विद्यार्थ्यांच्या सामाजिक अभिवृत्ती व सामाजिक मूल्यांचा विकास हा त्यांना देण्यात येणारे शैक्षणिक अनुभव व त्यांच्यावर केले जाणारे संस्कार

यावर अवलंबून असतात. शाळेतील शैक्षणिक विकासाला, सामाजिक व नैतिक तसेच सांस्कृतिक विकासाला पोषक वातावरण तयार करण्याचे काम स्काऊट-गाईड उपक्रमांतून पार पाडले जाते म्हणूनच माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्यही स्काऊट-गाईड उपक्रमांवरच अवलंबून असते.

**2. संबंधित साहित्याचा आढावा (Literature Review):**

1. माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमात स्काऊट-गाईड विषयाची उपयोगिता.
   संशोधक – श्री वाल्मिक तानाजी इंगोले, वर्ष – 15 मे, 2015,
   विद्यापीठ – अमरावती विद्यापीठ, अमरावती.
2. माध्यमिक स्तरावरील व्यक्तिमत्त्व विकास विषयाच्या अध्यापनातील समस्यांचा अभ्यास.
   संशोधिका – सौ. अस्मिता हेमंत देशपांडे, वर्ष – जानेवारी, 2012,
   विद्यापीठ – पुणे विद्यापीठ, पुणे
3. मराठवाड्यातील स्काऊट-गाईड चळवळ : एक अभ्यास.

   संशोधक – श्री हरकळ बालासाहेब सदाशिवराव, वर्ष – ऑगस्ट, 2013
   विद्यापीठ – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**2. साधने (Materials) :**

1. समतुल्य द्विगट अभिकल्पातील विद्यार्थी पूर्व चाचणी व विद्यार्थी उत्तर चाचणी.

**3. संशोधन पध्दती (Research Methodology) :**

प्रस्तुत संशोधनासाठी लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील जि. प. प्रशाला, नळेगाव व कै. नरसिंगराव चव्हाण माध्यमिक विद्यालय या दोन शाळांची व तेथील इ. 10 वी च्या वर्गातील प्रत्येकी 50-50 अशा 100 विद्यार्थ्यांची जनसंख्या विचारात घेण्यात आली. कार्यवाहीचे टप्पे खालीलप्रमाणे आहेत –

1. प्रयोजनासाठी निवडलेल्या 100 विद्यार्थ्यांना पूर्व चाचणी देण्यात आली.
2. पूर्व चाचणीच्या निकालाच्या आधारे एक गट नियंत्रित तर दुसरा गट प्रयोगिक असे निश्चित करण्यात आले.
3. प्रायोगिक गटावर स्काऊट-गाईड उपक्रमाची उपचार मात्रा देण्यात आली तर नियंत्रित गटास त्यापासून वंचित ठेवले गेले.
4. नंतर दोन्ही गटास उत्तर चाचणी देऊन उत्तर चाचणतील प्राप्तांकाचे मध्यमान काढून त्यावरून प्रयोगाची परिणामकारकता ठरविण्यात आली.
5. प्राप्त माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण करण्यात आले व शेवटी निष्कर्ष मांडण्यात आले.

<u>**समतुल्य द्विगट अभिकल्पाची मांडणी**</u>



**4. कार्यवाहीची चर्चा (Discussion) :**

प्रस्तुत संशोधन हे इ. 10 वी च्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीसाठी स्काऊट गाईड उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्यासाठी प्रयोगाद्वारे तपासण्यात आले. प्रयोगाद्वारे प्राप्तकांचे मध्यमान काढून माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

**5. विश्लेषण (Analysis):**

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीत स्काऊट गाईड उपक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्यात आला. त्यामध्ये असे आढळून आले की, स्काऊट गाईड उपक्रमाची मात्रा दिलेला गट हा स्काऊट गाईड उपक्रमाची मात्रा न दिलेल्या गटापेक्षा प्रगत दिसून आला. माहितीचे अर्थनिर्वचन करून विश्लेषणावरून निष्कर्ष प्राप्त झाले. त्यांची व्यवस्थित मांडणी केली. दोन्ही गटातील विद्यार्थ्यांच्या उत्तर चाचणीतील मिळालेल्या प्राप्तांकांचे मध्यमान काढून त्या दोन्ही मध्यमानाची तुलना करून स्काऊट गाईड उपक्रमाची व्यक्तिमत्त्व जडणघडणीतील परिणामकारकता तपासली.

**6. निष्कर्ष (Findings) :**

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत –

1. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीसाठी स्काऊट गाईड उपक्रमाची भूमिका परिणामकारक आहे.
2. माध्यमिक स्तरावरील स्काऊट गाईड उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वास पोषक अशा स्वावलंबन, स्वसंरक्षण, राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकता व एकात्मता, बंधुभाव इ. मानवी मूल्यांच्या विकास होतो.
3. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक, बौध्दिक, सामाजिक व आत्मिक विकासासाठी स्काऊट गाईड उपक्रमाची परिणामकारकता दिसून येते.

**7. परिणाम (Result) :**

शालेय माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी त्यांच्यावर चांगले संस्कार करणे आवश्यक आहे. तसेच ते उद्याचे आदर्श व चारित्र्य संपन्न नागरिक घडावेत यासाठी राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा, सांस्कृतिक आदानप्रदान, ऐतिहासिक व मूल्याधिष्ठित प्रणालीसाठी स्काऊट गाईड चळवळ अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांमधील उपजत कला कौशल्य गुणांची जोपासना करून त्यांना छंदाकडून चरितार्थाकडे नेण्याचे महत्त्वाचे कामही स्काऊट गाईड अभ्यासक्रमातून पार पाडले जाते.

**8. शिफारशी (Recommendation) :**

1. स्काऊट गाईड उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी पालकांनी विद्यार्थ्यांस प्रवृत्त करणे गरजेचे असते.
2. शालेय माध्यमिक स्तरावर स्काऊट गाईड उपक्रम अनिवार्य करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे.
3. प्रस्तुत उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना SSC परीक्षेत अधिकचे गुण देण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**Tables.1**

| अ.क्र. | शाळांची संख्या | इ. 10 वीतील विद्यार्थ्यांची जनसंख्या | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नियंत्रित गट | | प्रायोगिक गट | | |
| | | मुले | मुली | मुले | मुली | |
| 1. | 02 | 25 | 25 | 25 | 25 | 100 |

**9. निष्कर्ष (Conclusion/Summery) :**

प्रस्तुत संशोधन हे शालेय माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीत स्काऊट गाईड उपक्रमाची परिणामकारकता तपासण्यासाठी करण्यात आलेले आहे. यामध्ये प्रयोगिक संशोधन पध्दतीतील समतुल्य द्विगट अभिकल्पाचा वापर करून पूर्व चाचणी व उत्तर चाचणी घेण्यात आली. उत्तर चाचणीतून मिळालेल्या प्राप्तांकाचे मध्यमान काढून दोन्ही गटांच्या मध्यमानांच्या तुलनेद्वारे निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

**संदर्भ साहित्य (References) :**

1. भिंताडे वि. रा. : (1998), शैक्षणिक संशोधन पध्दती, तृतीय आवृत्ती, नित्यनूतन प्रकाशन, पुणे
2. सोहनी चित्रा : (1999), पुष्प पाचवे, प्रायोगिक संशोधन पध्दती, य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक
3. राज्य चिटणीस : (2010), स्काऊट गाईड अभ्यासक्रम, महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड्स, मुंबई.